ISSN:3108-253X
Special Issue : February,2026

RAAVI

An International Journal of Multidisciplinary Research

# AI, मानवी हक्क आणि नैतिकता

**सहा. प्रा. अस्मिता मिलिंद चांदगुडे**

राज्यशास्त्र विभाग, श्री छत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय , भवानीनगर

**सहा. प्रा. हर्षदा तात्यासो वानखेडे**

राज्यशास्त्र विभाग, श्री छत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय , भवानीनगर

---

**सारांश (Abstract) -**

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) हे आधुनिक तंत्रज्ञानातील एक महत्त्वाचे क्षेत्र असून त्याचा वापर आरोग्य,शिक्षण,उद्योग,प्रशासन & सुरक्षा या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे मानवी जीवन अधिक सोपे,वेगवान आणि कार्यक्षम झाले आहे. परंतु AI च्या वाढत्या वापरामुळे मानवी हक्क आणि नैतिकतेशी संबंधित अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

या संशोधन पेपर मध्ये AI चा मानवी हक्कावर होणारा परिणाम आणि त्या संबंधित नैतिक प्रश्नांचा अभ्यास करण्यात आला आहे.AI मुळे शिक्षण,आरोग्य & प्रशासन क्षेत्रात सकारात्मक बदल झाले असले तरी व्यक्ती स्वातंत्र्याचा भंग,भेदभाव,रोजगार कमी होणे, नागरिकांवर वाढती निगराणी यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या संशोधनातून असे दिसून येते की AI चा योग्य आणि जबाबदारीपूर्वक वापर केल्यास मानवी विकासाला मोठी मदत होऊ शकते. परंतु AIचा गैरवापर झाल्यास मानवी स्वातंत्र्य & अधिकार धोक्यात येऊ शकतात. यामुळे AI च्या वापरासाठी स्पष्ट कायदे,नैतिक तत्वे & मानवी हक्कांचे संरक्षण करणारी धोरणे आवश्यक आहेत.

**कळ शब्द (Key Words) -**कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी हक्क , नैतिकता , गोपनीयता , पारदर्शकता, विकास



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026

RAAVI

An International Journal of Multidisciplinary Research

**प्रस्तावना -**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे संगणक प्रणालींना मानवी जीवन बुद्धिमत्तेसारखे कार्य करण्यास सक्षम करणारे तंत्रज्ञान होय. AI प्रणाली मोठ्या प्रमाणातील माहितीवर प्रक्रिया करून निर्णय घेऊ शकतात.आज AI चा वापर आरोग्य सेवा, शिक्षण, बँकिंग, उद्योग, शासन, सुरक्षा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होत आहे. आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे अत्यंत वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. AI म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्ते सारखे विचार करण्याचे ,शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारी प्रणाली होय. इंटरनेट ,स्मार्टफोन ,डिजिटल सेवा आणि संगणकीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे AI चा वापर विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होत आहे.

AI च्या सहाय्याने मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण जलद गतीने करता येते,अचूक निर्णय घेता येतात आणि अनेक कामे स्वयंचलित पद्धतीने पूर्ण होतात.यामुळे उत्पादन क्षमता वाढली असून वेळ व श्रमाची बचत होत आहे. परंतु AI च्या वाढत्या वापरामुळे मानवी हक्क & नैतिकतेशी संबंधित अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. AI प्रणाली मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक माहिती गोळा करतात, त्यामुळे व्यक्तीच्या गोपनीयतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. काही AI प्रणाली पक्षपाती असू शकतात, ज्यामुळे समानतेचा हक्क धोक्यात येऊ शकतो.तसेच AI आधारित निर्णय प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे मानवी हक्काचे संरक्षण आणि नैतिक तत्वांचे पालन करणे अत्यंत आवश्यक ठरते.मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्मता मिळणारे मूलभूत अधिकार होय.जीवनाचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समानतेचा हक्क, गोपनीयतेचा हक्क आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे महत्त्वाचे मानवी हक्क आहेत. AI चा वापर करताना या हक्कांचे संरक्षण करणे ही समाज आणि शासनाची जबाबदारी आहे.

AI च्या विकासामुळे रोजगाराच्या संधीमध्ये बदल होत आहेत. काही पारंपारिक रोजगार कमी होत असताना नवीन तांत्रिक रोजगार निर्माण होत आहेत.त्यामुळे समाजात आर्थिक आणि सामाजिक बदल घडत



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026
RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research

आहेत.या बदलांचा मानवी जीवनावर आणि मानवी हक्कांवर मोठा परिणाम होत आहे. AI मुळे जीवन सोपे झाले असले तरी मानवी हक्कांचे उल्लंघन होण्याची शक्यता वाढली आहे.

**उद्देश -**

1) कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना अभ्यासणे.
2) AI आणि मानवी हक्क यांच्यातील संबंध अभ्यासणे.
3) AI मधील नैतिक समस्या ओळखणे.
4) AI चे फायदे आणि तोटे अभ्यासणे.
5) मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी उपाय सुचवणे.
6) जबाबदार AI वापराचे महत्त्व स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धतीचे स्त्रोत -**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात प्रामुख्याने संशोधन पत्रिका, अग्रलेख ,संदर्भ ग्रंथ, इंटरनेटवरील माहिती यातून मिळालेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**AI ची संकल्पना -**

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्ते सारखी विचार करण्याची, शिकण्याची,निर्णय घेण्याची, समस्या सोडवण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान होय. साध्या भाषेत सांगायचे झाल्यास AI म्हणजे मशीनला "बुद्धिमान" बनवण्याची प्रक्रिया होय.

AI प्रणाली मोठ्या प्रमाणात माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करतात आणि त्यावर आधारित योग्य निर्णय घेतात. उदा. मोबाईल मधील आवाज ओळख प्रणाली, चेहरा ओळख प्रणाली, ऑनलाइन शिफारशी आणि स्वयंचलित वाहनेही AI ची उदाहरणे आहेत.



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102
Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996

**मानवी हक्काची संकल्पना -**

मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्मता मिळणारे मूलभूत अधिकार होय.हे अधिकार व्यक्तीच्या स्वातंत्र्य ,समानता, प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेचे संरक्षण करतात.मानवी हक्क कोणत्याही व्यक्तीला धर्म, जात, लिंग, भाषा, वंश किंवा राष्ट्रीयत्व यांवर आधारित भेदभाव न करता समानपणे मिळतात. मानवी हक्क हे सार्वत्रिक आहेत. म्हणजेच ते जगातील प्रत्येक व्यक्तीस लागू होतात. मानवी हक्कांचा मुख्य उद्देश व्यक्तीचे जीवन सन्मानपूर्वक व सुरक्षित बनवणे हा आहे .जीवनाचा अधिकार,स्वातंत्र्याचा अधिकार,समानतेचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, गोपनीयतेचा अधिकार आणि कामाचा अधिकार हे मानवी जीवनाचे महत्त्वाचे अधिकार आहेत. मानवी हक्क समाजात न्याय,शांतता आणि समानता निर्माण करण्यास मदत करतात. मानवी हक्कांशिवाय व्यक्तीचे जीवन सुरक्षित आणि सन्मानपूर्वक राहू शकत नाही. त्यामुळे AI चा विकास करताना या मानवी अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

**AI आणि मानवी हक्क यांचा संबंध -**

AI ही आधुनिक तंत्रज्ञानातील महत्त्वाची प्रगती आहे. AI चा वापर समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे. AI मुळे मानवी जीवन अधिक सोपे आणि कार्यक्षम झाले आहे. AI तंत्रज्ञानाचा योग्य वापर मानवी हक्कांना बळकटी देऊ शकतो. तर चुकीचा वापर मानवी हक्कांचे उल्लंघन करू शकतो.AI चा मानवी हक्कांवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचा परिणाम होतो.

**AI चे मानवी हक्कांवरील सकारात्मक परिणाम -**

1) आरोग्य सेवेमध्ये सुधारणा - AI मुळे आजारांचे निदान जलद व अचूक होते.त्यामुळे लोकांना योग्य उपचार वेळेवर मिळाल्याने जीवनाच्या अधिकाराचे संरक्षण होते.



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102
Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996

2) शिक्षणाचा प्रसार - AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देतात.ऑनलाईन शिक्षणामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही शिक्षण मिळते. त्यामुळे शिक्षणाच्या अधिकाराला प्रोत्साहन मिळते.

3) प्रशासनातील पारदर्शकता - AI चा वापर सरकारी सेवांमध्ये केल्याने कामे जलद व पारदर्शक होतात.त्यामुळे न्याय व समानतेचे संरक्षण होते.

4) सुरक्षा वाढ -AI आधारित सुरक्षा प्रणाली गुन्हे शोधण्यास मदत करतात. त्यामुळे नागरिकांचे जीवन आणि सुरक्षिततेचे अधिकार मजबूत होतात.

5) अपंग व्यक्तींना मदत - AI आधारीत साधनांमुळे अपंग व्यक्तींना दैनंदिन जीवनात मदत मिळते. त्यामुळे समानेतेचा अधिकार मजबूत होतो.

**AI चे मानवी हक्कांवरील नकारात्मक परिणाम -**

1) गोपनीयतेचा भंग - AI प्रणाली मोठ्या प्रमाणात वैयक्तिक माहिती गोळा करतात. त्यामुळे व्यक्तीच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप करण्याची शक्यता असते. हा गोपनीयतेच्या अधिकारावर परिणाम करतो.

2) भेदभाव व पक्षपातीपणा - AI प्रणाली तयार करताना वापरलेल्या डेटामध्ये पक्षपातीपणा असल्यास AI चे निर्णयही पक्षपाती होऊ शकतात. त्यामुळे काही समाज घटकांवर अन्याय होऊ शकतो.

3) रोजगारावर परिणाम - AI मुळे पारंपरिक नोकऱ्या कमी होण्याची शक्यता आहे.यामुळे बेरोजगारी वाढू शकते आणि आर्थिक असमानता वाढू शकते.

4) मानवी स्वातंत्र्यावर मर्यादा - AI आधारित निगराणी प्रणाली मुळे लोकांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते .यामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येऊ शकतात.

5) माहितीचा गैरवापर - AI चा वापर करून खोटी माहिती किंवा दिशाभूल करणारी माहिती पसरवता येते. यामुळे समाजात गोंधळ आणि तणाव निर्माण होऊ शकतो.



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102
Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026
RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research

6) मानवी मूल्यांवर परिणाम - AI वर जास्त अवलंबून राहिल्यास मानवी विचारशक्ती, सर्जनशीलता आणि नैतिक निर्णय क्षमता कमी होऊ शकते.

**AI आणि नैतिकता -**

AI नैतिकता म्हणजे AI चा वापर योग्य आणि जबाबदारीने करण्यासाठी नैतिक नियम होय.

AI नैतिकतेची प्रमुख तत्वे -

1) पारदर्शकता - AI प्रणालीची कार्यपद्धती पारदर्शक असावी.

2) न्याय - AI चे निर्णय सर्वांसाठी समान असावेत.

3) जबाबदारी - AI च्या चुकीच्या निर्णयासाठी जबाबदार व्यक्ती निश्चित असावी.

4) गोपनीयता - व्यक्तीची माहिती सुरक्षित ठेवली पाहिजे .

5) मानवी नियंत्रण - अंतिम नियंत्रण मानवाचे असावे.

AI चा सुरक्षित वापर करण्यासाठी डेटा संरक्षण कायदे, गोपनीयतेचे संरक्षण, AI चा नैतिक वापर, मानवी हक्कांचे संरक्षण इत्यादी कायदे व धोरणे तयार करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष -**

AI तंत्रज्ञान मानवासाठी उपयुक्त असले तरी त्याचा वापर योग्य नियम आणि नैतिकतेच्या चौकटीत करणे आवश्यक आहे. अन्यथा AI मुळे मानवी हक्कांना धोका निर्माण होऊन नैतिक मूल्य धोक्यात येऊ शकतात. AI चा विकास मानवी हक्क, न्याय आणि नैतिकतेच्या तत्त्वांवर आधारित असणे आवश्यक आहे. मानवी हक्कांचे संरक्षण हे AI विकासाचे मुख्य उद्दिष्ट असावे. AI चा योग्य वापर केल्यास मानवाचा विकास होईल. अन्यथा मानवी स्वातंत्र्य आणि अधिकार धोक्यात येऊ शकतात. त्यामुळे मानवी हक्क नैतिकता यामध्ये संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे.



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102
Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996

RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research
ISSN:3108-253X
Special Issue : February,2026

**संदर्भ सूची –**

1. कुलकर्णी, सं. (2022). तंत्रज्ञान, समाज आणि नैतिकता. औरंगाबाद : विद्यापीठ प्रकाशन.
2. भारत सरकार (2020). राष्ट्रीय कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण (National Strategy for Artificial Intelligence). नवी दिल्ली : नीति आयोग.
3. पाटील, र. (2023). "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी हक्क : एक समीक्षात्मक अभ्यास". समकालीन राज्यशास्त्र, खंड 12, अंक 2, पृ. 45–58.
4. जोशी, म. (2022). डिजिटल युगातील गोपनीयता आणि मानवी अधिकार. मुंबई : ग्रंथाली.
5. मानवाधिकार आयोग (2019). मानवी हक्क : संकल्पना आणि आव्हाने. नवी दिल्ली : एनएचआरसी.
6. शिंदे, अ. (2021). "कृत्रिम बुद्धिमत्ता, रोजगार आणि सामाजिक बदल". भारतीय समाजशास्त्र जर्नल, खंड 8, अंक 1, पृ. 66–78.

❑❑❑



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com
Email: raavipublications@gmail.com
WhatsApp: 9665841996